(१)

1/12/21

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४११००४

**परिपत्रक क्रमांक रा.मं/पापुई/इ.१०वी व इ.१२वी व्यवसाय अभ्यासक्रम/ मूल्यमापन योजना/६७६६, दिनांक-०१/१२/२०२१.**

विषय – समग्र शिक्षा अभियानातंर्गत माध्यमिक/उच्च माध्यमिक स्तरावरील व्यवसाय शिक्षण या योजनेतंर्गत सुधारित अभ्यासक्रमानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुरू करणेबाबत.......

संदर्भ-१. राज्य प्रकल्प समन्वयक तथा सहसंचालक (प्रशासकीय) समग्र शिक्षा मुंबई यांचे जावक क्रमांक समग्र शिक्षा/व्य.शि.44/(71/16)2019/3240 दिनांक 29 ऑक्टोबर 2021 चे पत्र.

२. मा.सहसंचालक (प्रशा) तथा उपसचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन, समग्र शिक्षा, यांचे जा.क्र.रामाशिअ/व्य.शि/(71/16) २०१९/१८७३. दिनांक १७ सप्टेंबर,२०२०.

३. समग्र शिक्षा मुंबई यांचे जा.क्र.रामशिअ/व्य.शि/४४(71/16)2019/891,दिनांक १४ऑगस्ट, २०१९ चे पत्र.

४. या कार्यालयाचे परिपत्रक पापुई/इ.९व इ.१२वी व्यवसाय अभ्यासक्रम/४३९३, दिनांक १३.१०.२०२०

राज्यातील सर्व माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळाप्रमुखांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, समग्र शिक्षा अंतर्गत राज्यात व्यवसाय शिक्षण माध्यमिक/ उच्च माध्यमिक स्तर योजनेची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. सदर विषय कोणत्या विषयास पर्याय म्हणून राहणार आहेत, या संदर्भातील शासन निर्णय दिनांक २१ ऑगस्ट,२०१४ व शुध्दिपत्रक दिनांक १४ मे,२०१५ रोजी निर्गमित करण्यात आले होते. सदर निर्णयानंतर सुधारित शासन निर्णय व्य.शि.२०१९/प्र.क्र.७०/एसडी-६, दिनांक ०३ऑक्टोबर,२०१९ व्दारे आदेश निर्गमित झालेले आहेत.

या मंडळाचे संदर्भीय परिपत्रक क्र.०४ चे अवलोकन व्हावे. सदर परिपत्रकानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून इ.९वी,११वी व शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून इ.१०वी,इ.१२वीच्या सुधारित अभ्यासक्रम, विषय व विषयांचे कोड क्रमांक कळविण्यात आलेले असून, सदर सुधारित जॉब रोल अभ्यासक्रमानुसार माध्यमिक शालांत/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२१ चे आयोजन होणार असल्याचे नमूद करण्यात आलेले होते.

तथापि, इ.९वी व इ.११वीच्या मूल्यमापन योजनेमध्ये कोणताच बदल नसल्यामुळे **( लेखी परीक्षा -३० गुण- [ ८० गुणाची परीक्षा घेऊन ३० गुणांत रूपांतर करणे )** सदर परिपत्रकामध्ये नोंद केल्याप्रमाणे इ.९वी, इ.११वीसाठी मूल्यमापन योजना लागू राहील.

तसेच **संदर्भीय क्र.०१ च्या पत्रान्वये समग्र शिक्षा** ,मुंबई यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ पासून इ.१०वी, इ.१२वी मध्ये राबविले जाण्या-या विषयांची यादी व इ.९वी मध्ये सुरु होणा-या नविन विषयांची यादी व पाठयपुस्तके प्राप्त झालेली आहेत. इ.९वी ते इ.१२ वीच्या विषयांची नावे व नवीन विषय कोड क्रमांक याचा तपशील खालीलप्रमाणे -

1) NSQF अंतर्गत इ.१०वी-

| अ.क्र | विषय कोड क्रमांक | अभ्यासक्रमाच्या विषयाचे नांव | इ.९वीसाठी सुधारित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष | इ.१० वीसाठी सुधारित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | X1 | Multi Skill Assistant Technician/ Introducation to Basic Technology | 2019-20 पासून | 2020-21 पासून |
| २ | X2 | Automotive Service Technician | 2019-20 पासून | 2020-21 पासून |
| ३ | X3 | Store Operations Assistant | 2019-20 पासून | 2020-21 पासून |
| ४ | X4 | Assistant Beauty Therapist | 2019-20 पासून | 2020-21 पासून |
| ५ | X6 | Tourism and Hospitality -Food & Beverage Service Trainee | 2019-20 पासून | 2020-21 पासून |
| ६ | X7 | Agriculture -Solanaceous Crop Cultivator | 2019-20 पासून | 2020-21 पासून |
| ७ | X8 | Electronics and Hardware -Field Technician – Other Home Appliances | 2019-20 पासून | 2020-21 पासून |
| ८ | **X9** | **Health Care-Home Health Aide** | **2020-21 पासून** | **2021-22पासून** • |
| ९ | ९५ | Power-Consumer Energy Meter Technician | 2019-20 पासून | 2020-21 पासून |
| १० | ९७ | Apparels-Sewing Machine Operator - | 2019-20 पासून | 2020-21 पासून |
| ११ | ९८ | **Plumber-General** | **2021-22 पासून** | **2021-22 पासून** • |
| १२ | | **Physical Educatdion and Sports** | 2021-22 पासून | **2022-23 पासून** • |

उपरोक्त X1, X2, X3, X4, X6, X7, X8, X9 व 95, 97,98 या विषयांची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च-२०२२ मध्ये प्रचलित अभ्यासक्रम व मूल्यमापन आराखडयाप्रमाणे आयोजित करण्यात येणार आहे.

अ. NSQF अंतर्गत इ.१०वीच्या विषय क्रमांक X5 हा विषय शैक्षणिक वर्ष २०२०-२१पासून समग्र शिक्षा, मुंबई यांच्याकडून सदर विषय बंद करण्यात आला आहे. तरी सदर विषयामध्ये उत्तीर्ण न झालेल्या विदयार्थ्यांस

(विषय क्र.X5 )जुन्या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार लगतच्या दोन म्हणजेच सन २०२०-२१मधील पुरवणी परीक्षा व मार्च-२०२१ ची नियमित परीक्षा या दोन संधी देण्यात आल्या असून मार्च-२०२२, च्या परीक्षेपासून संधी दिली जाणार नाही. जे विद्यार्थी सदर विषयामध्ये उत्तीर्ण न झालेल्या विद्यार्थ्यांस NSQF अंतर्गत नवीन विषय न घेता, विद्यार्थ्यांनि भाषा अथवा सामाजिकशास्त्रे या विषयांपैकी जो विषय वगळला असेल, तो वगळलेला विषय घेवून, पुनश्च: परीक्षेस प्रविष्ठ होवून, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल.

ब. उपरोक्त विषय कोड क्रमांकमधील •X9- Health Care-Home Health Aide व •९८- Plumber- General हे दोन विषय शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून इ.९वीसाठी व शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून इ.१०वीसाठी सुरू झालेले आहेत. त्यामुळे सदर X9- Health Care-Home Health Aide व ९८- Plumber- General या दोन विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च-२०२२ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे.

## 2. NSQF अंतर्गत इ.१२वी-

| अ.क्र. | विषय कोड क्रमांक | अभ्यासक्रमाच्या विषयाचे नांव | इ.११ वीसाठी सुधारित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष | इ.१२ वीसाठी सुधारित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | E 3 | Multiskill Technician (Electrical) | 2016-17 पासून | 2017-18 पासून |
| २ | E6 | Multiskill Technician (Food Processing) | 2016-17 पासून | 2017-18 पासून |
| ३ | F6 | Electronics- Field Technician Wireman Control Panal | **2020-21 पासून** | **2021-22 पासून** • |
| ४ | F8 | Power-Distribution Lineman | **2020-21 पासून** | **2021-22 पासून** • |
| ५ | G1 | Specialized Sewing Machine Operator | **2020-21 पासून** | **2021-22 पासून** • |
| ६ | G2 | **Plumber** General - II | **2020-21 पासून** | **2021-22 पासून** • |
| ७ | G3 | Automotive Service Technician | 2019-20 पासून | 2020-21 पासून |
| ८ | G4 | Retail -Sales Associate | 2019-20 पासून | 2020-21 पासून |
| ९ | G5 | Healthcare -General duty Assistant | 2019-20 पासून | 2020-21 पासून |
| १० | G6 | Beauty Therapist | 2019-20 पासून | 2020-21 पासून |
| ११ | G8 | Agriculture -Microirrigation Technician | 2019-20 पासून | 2020-21 पासून |
| १२ | G9 | Tourism and Hospitality-Customer Service Executive (Meet & Greet) | 2019-20 पासून | 2020-21 पासून |
| १३ | | **Physical Education and Sports Fitness Trainer** | 2020-21 पासून | **2022-23 पासून** • |

उपरोक्त **F-6, G3 ते G9** या विषयांची सुधारित अभ्यासक्रम, जॉबरोल व Employbility Skills नुसार व मूल्यमापन आराखडयाप्रमाणे व **E-3, E-6,** या विषयांचा अभ्यासक्रम व जुन्या आराखडयानुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च-२०२२ आयोजित केली जाणार आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळ पुणे, परिपत्रक क्र.रा.म/पापुइ.६/उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम /१८७६ दि.१०/४/२०१७ नुसार कला,वाणिज्य व विज्ञान या शाखे मध्ये इ ११ वी मध्ये प्रवेशित होणाऱ्या विदयार्थ्यांना इ.११ वी व १२ वी साठी च्या नियमित चार वैकल्पीक विषयापैकी (Elective Subjects) पैकी एक विषय वगळून व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमतील एक विषय घेता येइल. समग्र शिक्षा मुंबई यांचे जा.क्र.रामशिअ/व्य.शि/४४(71/16)2019/891,दिनांक १४ऑगस्ट,२०१९ चे पत्रानुसार १० वी मध्ये जरी बिदयार्थ्यांनी उपरोक्त विषयातील व्यवसाय विषया पैकी विषय निवडला नसेल तरी विदयार्थ्यांना ११ वी मध्ये या विषयाची निवड करता येइल.

अ. <u>**NSQF अंतर्गत**</u> इ.१२वीच्या विषय क्रमांक **E-2, E-4, E-5, F3,F4 ,G7,** या विषयांचा समग्र शिक्षाच्या दिनांक 29.10.2021 च्या पत्रामध्ये नमूद नसल्याने हे विषय बंद झाल्याचे समजण्यात यावे.

**(विषय क्र. E-2, E-4, F3,F4 ,G7 )**जुन्या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार लगतच्या दोन म्हणजेच मार्च-२०२१ व सप्टेंबर २०२१मधील पुरवणी परीक्षा या दोन संधी देण्यात आलेल्या होत्या. त्यामुळे विदयार्थ्यांना मार्च-२०२२ च्या परीक्षेपासून पुनश्चःसंधी दिली जाणार नाही. सदर दोन संधी देवूनही विदयार्थी सदर विषयामध्ये उत्तीर्ण न झाल्यास, विदयार्थ्यांने उपरोक्त बदलेला विषय न घेता,कला/वाणिज्य/विज्ञान या शाखेसाठी जो शासन निर्णय दिनांक ०८ ऑगस्ट,२०१९च्या विषय योजनेतील योग्य विषयाची निवड करून, पुनश्चः परीक्षेस प्रविष्ठ होवून,उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागेल.

परंतू **E5** या विषयाची प्रथम परीक्षा मार्च २०२१ मध्ये घेण्यात आली होती,त्यामुळे या विषयाच्या विदयार्थ्यांना पुरवणी परिक्षा सप्टेबंर-ऑक्टोबंर २०२१ प्रथम संधी व मार्च २०२२ च्या परीक्षेस दुसरी व शेवटची संधी राहील.

ब. उपरोक्त नवीन विषय **Physical Education and Sports-Fitness Trainer** हा एक विषय शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून इ.११वी व शैक्षणिक वर्ष २०२२-२३पासून इ.१२ वीकरिता सुरू होणार आहेत. त्यामुळे सदर विषयाची उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च-२०२३ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे.

संदर्भीय क्र.०४-परिपत्रकातील इ.९वी व इ.११वी साठी नमूद केलेल्या माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांची विषय योजना; मूल्यमापन योजना व तासिका तसेच इतर बाबी लागू राहातील याची नोंद घ्यावी.

(९)

तसेच सदर विषयाचे अभ्यासक्रम पंडित सुंदरलाल शर्मा सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ व्होकेशन एज्युकेशन (PSSCIVE) भोपाळ या संस्थेचे मान्यताप्राप्त असल्याने, शासनाने त्यास मान्यता दिलेली आहे.त्यामुळे NSQF अंतर्गत असलेल्या व्यवसाय शिक्षण विषयास **मंडळाची वेगळी विषय मान्यता शाळा/उच्च माध्यमिक शाळांनी घेण्याची आवश्यकता नाही.** सदर अभ्यासक्रम PSSCIVE संस्थेच्या www.psscive.nic.in या संकेत स्थळावर व मंडळाच्या www.mahahsscboard. maharashtra. gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. सदर परिपत्रक संबंधित शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांचे निदर्शनास आणून शाळांच्या सूचना फलकावर लावण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय मंडळास सादर करावा. **इ.१०वी व इ.१२वीच्या सुधारित अभ्यासक्रम, जॉब रोलनुसार मूल्यमापन आराखडे, प्रात्यक्षिक गुणदान योजना, घटकनिहाय गुणविभागणी इ. मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.**

ठिकाण- पुणे
दिनांक- ०१.१२.२०२१.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च उच्च मध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे-०४.

क्रमांक : नाविमं/माध्य.ब-२/२२०७.
नाशिक ४२२ ००३
दिनांक-०६/१२/२०२१

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक विदयालये,
नाशिक, धुळे, जळगांव व नंदुरबार जिल्हे.

विषय — समग्र शिक्षा अभियानांतर्गत माध्यमिक/उच्च माध्यमिक स्तरावरील व्यवसाय शिक्षण या योजनेअंतर्गत सुधारित अभ्यासक्रमानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुरू करणेबाबत...

आपणास कळविण्यात येते की, परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करावी.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक — ४२२ ००३.